राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, नवी मुंबई

V

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०१ १०१ दुरध्वनी क्र.२८१८११८२, २८१९२८२८.

सूचना का अधिकार RIGHT TO INFORMATION

## जाहिरात विभाग

जा.क्र.मनपा/जाहिरात/ ४८ /२०१८-१९

दि. १५/०५/२०१८.

प्रति,
श्री. प्रविण काशिराम पाटील,
रॉयल पॅलेस, कावेरी ००३,
रा.मिरागांव, गंगानगर,
मिरारोड, ता.जि.ठाणे ४०१ १०७

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५
जाहिरात होर्डिंग्ज बाबत

संदर्भ :- १) दि.२७/०६/२०१७ रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.
२) दि.२९/०९/२०१७ रोजीचे प्रथम अपिल अर्ज.
३) जा.क्र.मनपा/उप-आयुक्त/जाहि/१६७/२०१७-१८ दि.०६/१०/२०१७ सुनावणीस उपस्थित राहणेबाबत अर्ज.
४) जा.क्र.माअधि/अपिल/जाहिरात/१६७/२०१७ दि.१३/१०/२०१७ रोजीचे निर्णय

महोदय,

आपला माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६(१) प्रमाणे केलेला अर्ज आमच्याकडे प्राप्त झाला आहे. सदर माहिती अधिकारात माहिती प्राप्त न झाल्याने आपण संदर्भ क्र.२ अन्वये प्रथम अपिल दाखल केले आहे. आपण दिलेल्या दि.२४/०३/२०१७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर कारवाई अपेक्षिलेली आहे.

आपला दि.२४/०३/२०१७ रोजीचा तक्रार अर्ज प्रभाग कार्यालय क्र.६ येथे कारवाई करीता पाठविण्यांत आला होता. सदर अर्जानुसार प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र.६ यांनी विनापरवानगी केलेले वाढीव बांधकाम यांच्या मार्फत तोडण्यांत आल्याचे कळविले आहे.

तसेच सदर ठिकाणच्या जाहिरात फलकास लायसन क्र.१०८ ने परवानगी देण्यांत आलेली आहे. सदरच्या परवानगीनुसार संबंधितांनी जाहिरात होर्डिंग्ज उभारलेले आहेत. या होर्डिंग्जमुळे रहदारीस अथवा वाहतुकीस अडथळा होत असल्यास पाहणीनुसार कारवाई करण्याबाबत कळविण्यांत येईल.

या व्यतिरिक्त आपणांस अधिक माहितीची आवश्यकता असल्यास कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत अभिलेख्यात उपलब्ध असलेल्या नस्तीच्या कागदपत्रांचे अवलोकन करण्यास उपलब्ध करुन देण्यांत येतील तसेच आवश्यक असलेली माहिती देणेची तजवीज ठेवण्यांत आलेली आहे.

15/5/2018

माहिती अधिकारी
तथा जाहिरात विभागप्रमुख
मिरा-भाईंदर महानगरपालिका

19/5/18 9820720004

१९/५/२०१४

D:\Madhuri OLD\Jahirat\Mahiti Adhikar Letter - Jahirat Dept .doc